# प्रकरण दुसरे

# रविचन्द्र हडसनकर व्यक्ती आणि व्यक्तिमत्व

प्रस्तुत प्रकरणात रविचन्द्र हडसनकर यांचा व्यक्ति परिचय त्यांचे व्यक्ति व्यक्तिमत्व , त्यांच्या लेखनप्रेरणा तसेच त्यांचा साहित्य परिचय आणि त्यांचे समकालीन कवी, व त्यांचे काव्य लेखनाचे वेगळेपण,यांचा अभ्यास केला आहे.

**१) जन्म :-**

रविचन्द्र हडसनकर यांचा जन्म ९ ऑगस्ट १९४९ रोजी हदगांव तालुक्यातील 'हडसनी' या गावी झाला. आई कोंडाबाई व वडील माधवराव हे दोघेही कष्टाळू होते. वरील बारा बलुतेदारांपैकी 'सुतार'असल्यामुळे गावातील श्रीमंत शेतक-यांची औजारे तयार करण्याचे काम करीत असत. हे काम करीत असताना त्यांना शेती करण्याचीही आवड होती. वडीलोपार्जित सहाएकर गावा शेजारी त्यांची शेती होती. घरी शेती असल्यामुळे त्यांच्या घरी गायी, म्हैशी होत्या. त्यामुळे त्यांच्या घरी दुधदुभतं ही होते. एकंदरीत त्यांचे घर खाऊन-पिऊन सुखी होते. घरातील सारेच कष्टाळू असल्यामुळे कोणत्याही कामात आळसपण करीत नव्हते. तीन भाऊ तीन बहिणी, अशी त्यांच्या कुंटंबातील संख्या होती. वडील दिसायला चांगले शरीरयष्टीने दणकट असल्यामुळे सर्व गावातील लोक त्यांना भीत असत.

रविचन्द्र हडसनकरांचे वडील मोडी इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण घेतले. म्हणून त्यांना वाचण्याची आवड होती. ते पंढरीच्या विठठलाचे भक्ती करीत असल्यामुळे गावात पोथी पुराण सांगण्याचा कार्यक्रम करीत असत. घरातच त्यांच्या भजन किर्तन होत असल्यामुळे आलेल्या कलावंत मंडळीचा पाहुणचार चांगला करीत असत. पाहुण्याराऊळयात ही त्यांना चांगला मान - सन्मान मिळत होता. गावातील पाटलांनाही जरब बसावी अशी धाडसी वृत्ती त्यांच्या

जवळ होती. काही वर्षानंतर रविचन्द्र हडसनकर यांच्या वडीलांमध्ये बदल झाला. १९५६ ला बाबासाहेबांनी बौध्द धम्माची 'दीक्षा' नागभूमीत दिली. आणि रविचन्द्र हडसनकरांच्या वडीलांचे वारक-यातून रूपांतर आंबेडकरी चळवळीतील एक सच्चा बुध्द धर्मीय कार्य कर्त्यात झाले.

**२) बालपण :-**

रविचन्द्र हडसनकरांचे संपूर्ण बालपण 'हडसनी' या गावातच गेले. " लहान वयातच " रविचन्द्र हडसनकरांच्या ओठावर शब्द नाचू लागले होते. रविचन्द्र हडसनकरांना लहानपणापासून गाणी म्हणायची आवड निर्माण झाली होती. लहान वयात असताना रविचन्द्र हडसनकरांनी 'दत्ताची गाणी' लिहिली. छापली आणि गात विकली. स्पष्ट आणि भारदस्त आवाजाची देणगी लाभलेला हा कवी लहानपणीच अनेकांच्या गळ्यातील ताईत झाला होता."

हडसनी या गावातील एक दलित कुटुंबातला रामचंदर या नावाने लोक त्यांना ओळखू लागले होते. ते दिवसभर माळरानावर फिरत राहायचे. गावातील गमतीदार माणसांचे किस्से तेवढ्याच गमतीदार आणि रंजक पध्दतीनं सांगायचे. रामचंदरची गोष्ट सांगण्याची सवय ही गावकऱ्यांना विलक्षण मोहित टाकायची.

पुढे " कृष्णाबाईच्या विठ्ठलरावाशी (निर्मलकुमार सुर्यवंशी यांचे जेष्ठ बंधू) या मुलाबरोबर विशेष अशी मैत्री झाली. कृष्णाबाईन सुध्दा (पाटील घराण्यातील ही अकाली वैधव्य आलेली माऊली) आपल्या पोटच्या मुलाइतकच रामचंदरचा (रविचन्द्र हडसनकर) संभाळ केला. त्याच्यावर भरपूर जीव लागला. अक्षरांच्या नादी लागू पाहण्याची त्यांची भूक या माऊलीनं जीवापाड जपली त्यांच्या जिद्दीला ही तिने जोरकसपणाने जपले. अक्षरांची नांवे रंगविणारा हा रंगकर्मी पुढे शब्दांतून चित्र रंगवू लागला. शब्द मांडणीतून संवाद साधू लागला. कृष्णाबाईनं त्यांना भरपूर आईसारखी माया केली.

त्यामुळेच कवी या नावाने रविचन्द्र हडसनकर ख्यात किर्त पावले व सर्वसामान्य साहित्यीक झाले.''

**३) शिक्षण :-**

रविचन्द्र हडसनकर यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता चौथीपर्यंत गावातच झाले. इयत्ता चौथीत ते प्रथम श्रेणीत पास झाल्यामुळे त्यांना निजाम सरकारची शिष्यवृत्ती मिळाली. पुढे त्यांनी नांदेड येथील महाविद्यालयातून मराठी विषयात बी. ए. (ऑनर्स) ची पदवी संपादन केली व नंतर दोन वर्षात त्यांनी एम. ए. ही पदवी घेतली. रविचन्द्र हडसनकरांना शिक्षण घेत असताना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. '' रविचन्द्र हडसकरांना बी. एड्. कॉलेजात प्रवेश घ्यायचा होता. बी. एड्. कॉलेजच्या प्राचार्यांनी त्यांना स्पष्ट शब्दात सांगितले, ' आज प्रवेश फी एकशे तीस रुपये भरली नाही तर तुमच्या जागी मी दुसऱ्या विद्यार्थ्याला प्रवेश देईन'' त्यावेळी हडसनकरांच्या पुढे प्रश्न पडला की, आता पैसे कुठुन आणायचे? अडचणीत असलेल्या प्रतिभावंताना नरहर कुरुंदकर दिसायचे म्हणून हडसनकर भर उन्हात पीपल्स कॉलेजमध्ये गेले. तेव्हा नरहर कुरुंदकर (गुरुजी) प्राचार्यांच्या केबीनमध्ये बसलेले पाहून हडसनकर त्यांच्याजवळ गेले. तेव्हा नरहर कुरुंदकर (गुरुजी) म्हणाले, '' या कविराज एवढ्या उन्हात कसे काय येणे केले?'' हडसनकरांना घाम पाहून मिस्किलपणे नरहर कुरुंदकर म्हणाले, '' तुम्ही सुर्याला मुठीत घेणारे डोळ्याच्या आगीतून ठिणग्या ओकणारे दलित साहित्यिक ना ? मग सुर्याला मुठीत घेणाऱ्या केवळ दुपारच्या उन्हात घाबरु नये.'' त्यावेळी हडसनकर काहीच न बोलता गप्प बसले. तेव्हा नरहर कुरुंदकरांनी येण्याचे कारण विचारले. हडसनकरांनी कारण सांगितले, '' एकशे तीस रुपये दिले तर मी बी. एड्ला प्रवेश घेऊ शकणार आहे. नरहर कुरुंदकरांनी लगेच त्यांना एकशे तीस रुपये दिले. वर पाच रुपये रिक्षाला दिले व सांगितले आता जाताना रिक्षाने जा.'' तेव्हा हडसनकरांना

प्रवेश मिळाला व ते बी. एड् झाले आणि नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात रुजु झाले. परंतु ती शिक्षणाची आठवण व नरहर कुरुंदकर यांचा मदतीचा हात विसलेले नाहीत.''

रविचन्द्र हडसनकरांना शिक्षणाची दिशा कृष्णाबाई या माऊलीने दाखविली व या माऊलीमुळेच रविचन्द्र हडसनकर शाळा शिकून कवी या नावारुपाला आले आहेत.

४) **काव्य लेखनाची प्रेरणा :-** रविचन्द्र हडसनकरांनी हदगांव येथे वामनदादा कर्डक यांचा कार्यक्रम ऐकला त्याचा परिणाम असा झाला की, आपण ही काहीतरी लिहिले पाहिजे, असे रविचन्द्र हडसनकरांना वाटू लागले. जसजसे रविचन्द्र हडसनकर वाचू लागले तसतसे ते लेखन करु लागले. त्यांच्या लेखनातून कविता निर्माण होऊ लागल्या. मराठा, मराठवाडा, अजिंठा, पुढारी, संचार, अस्मिता दर्श, सारख्या दैनिक आणि नियतकालिकांमधून कवितेला प्रसिध्दी मिळत गेली. '१९७०' साली औरंगाबाद येथे आकाशवाणी केंद्रावरूनही रविचन्द्र हडसनकर यांच्या काव्य वाचनाचे कार्यक्रम झाले. कवी रविचन्द्र हडसनकर यांचा खरा आदर्श वामनदादा कर्डक हेच आहेत. वामनदादा कर्डक यांच्यापासूनच काव्यलेखनाची प्रेरणा रविचन्द्र हडसनकरांना मिळाली.

**वैवाहिक जीवन :-**

रविचन्द्र हडसनकर यांचा आंतरजातीय विवाह आहे. सौ. हेमलता यांचा रविचन्द्र हडसनकर यांच्या जीवनात महत्वाचा वाटा आहे. रविचन्द्र हडसनकर व सौ. हेमलता या दोघांनी मिळून येणाऱ्या परिस्थितीवर मात करुन आपला सुखी संसार फुलविला आहे. हेमंत आणि प्राची अशी त्यांना दोन मुले आहेत. एकंदरीत रविचन्द्र हडसनकर यांचे वैवाहिक जीवन सुखी समाधानी आहे.

**रविचन्द्र हडसनकर यांचे साहित्य :-**

रविचन्द्र हडसनकरांनी दलित साहित्य क्षेत्रात चांगल्या प्रकारे साहित्य-निर्माण केले आहे. त्या साहित्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

१) ठिणगी (काव्यसंग्रह) मार्च १९७७, अभिनव प्रकाश, मुंबई

२) देणगी (काव्यसंग्रह) २६ जानेवारी १९८३, निर्मल प्रकाशन, नांदेड

३) दावण (कथासंग्रह) मार्च १९९४, निर्मल प्रकाशन, नांदेड

४) अरे माणसा माणसा (काव्य) ऑक्टो १९८७, निर्मल प्रकाशन, नांदेड

५) हळद उन्हे (काव्यसंग्रह), २८ सप्टे १९९०, निर्मल प्रकाशन, नांदेड

६) दरी (कथासंग्रह) जाने.१९९४, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर

७) माझ्या जीवनाचं गाणं (वामनदादा कर्डक चरित्र), १४ एप्रिल १९९६
निर्मल प्रकाशन, नांदेड

८) बगळ्या बगळ्या पाटील दे (बालकविता), जानेवारी-२००४,
निर्मल प्रकाशन, नांदेड

९) सूयझेप आणि तळगर्भ (काव्यसंग्रह) जाने.२००४, निर्मल प्रकाशन,नांदेड

१०)राजमुद्रा (काव्यसंग्रह), जानेवारी २००४ निर्मल प्रकाशन, नांदेड

११) भीममुद्रा (आंबेडकरी गाणी) मे २००५, सुवर्णभूमी प्रकाशन, अंबेजोगाई

१२) बोल उठी हलचल (वामन कर्डक गीत : संपादन) शब्ददान प्रकाशन, नांदेड

१३) सरण झळा (कथासंग्रह), मार्च २००६, निर्मल प्रकाशन, नांदेड

१४) ढगा ढगा पाणी दे (बालकविता), मार्च २००६, निर्मल प्रकाशन, नांदेड

१५) चवदार तळ्याचे पाणी (आंबेडकरी गाणी) १४ ऑक्टोबर २००७,
सुवर्णभूमी प्रकाशन, अंबेजोगाई, जि. बीड

ध्वमिुद्रिका (कॅसेट) १) गाथा २) समतेचा सूर्य) ३) बोला हो बोला जयभीम बोला

५) पुणे करार ५) लग्न गीते ६ ) किती भीमाची गाणे ७) भीम माझा असा होता.

**पुरस्कार गौरव :-**

१) महाराष्ट्र राज्य शासन उत्कृष्ट वाङ्:मय निर्मिती पुरस्कार

२) अस्मिता दर्श पुरस्कार

३) परिवर्तनवादी आंबेडकरी साहित्य पुरस्कार

४) हुंडाबंदी आंबेडकरी गीत लेखन पुरस्कार

५) यशवंतराव चव्हाण पुरस्कार

६) महाराष्ट्र दलित साहित्य अकादमी पुरस्कार

७) जेमिनी पुरस्कार

८) पु. भा.भावे पुरस्कार

९) तुफानातले दिवे वामन कर्डक पुरस्कार

१०)डॉ. आंबेडकर उत्कृष्ट काव्य लेखन पुरस्कार

११) 'हुज हू' ग्रंथात नोंद

१२) डॉ. आंबेडकर फेलोशिफ (नवी दिल्ली)

१३) इंटरनॅशनल मॅन ऑफ दि इयर (१९९६) (लंडन) पुरस्कार

इत्यादी पुरस्कारांनी सन्मानीत रविचंद्र हडसनकर आहेत.

**४) त्यांच्या समकालीन कवींचा थोडक्यात परिचय :-**

मराठी साहित्यात १९६० नंतर दोन वाङ्:मय प्रकार आले आणि मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावल्या. ग्रामीण आणि दलित साहित्य आपापल्या अंगभूत वैशिष्ठ्याने मराठी वाङ्:मयात उठून दिसू लागले. ग्रामीण जीवन, रुढी, परंपरा, शेती तसेच ग्रामीण भागातील दलित जीवन, जातीभेद त्यांच्यातील हेवेदावे असे विविध अंगाचे प्रत्ययकारी दर्शन ग्रामीण व दलित साहित्यात येऊ लागले. विशेषतः दलित साहित्यात कादंबरी नाटकापेक्षा कविता हा वाङ्:मय प्रकार फारच मोठ्या प्रमाणात लिहिला गेला. काव्यातून दलितांनी प्रथम आपल्या व्यथा वेदना मांडलेल्या आहेत. रविचन्द्र हडसनकरांनी १९७७ पासून काव्य लेखनास प्रारंभ

करुन 'ठिणगी' या काव्यसंग्रहाची दलित साहित्यात भर घातली. रविचन्द्र हडसनकरांचे साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे. त्याच काळात काही कवीनी ही रविचन्द्र हडसनकरांबरोबर साहित्य लिहून दलित साहित्यात आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला आहे ते समकालीन कवी खालीलप्रमाणे आहेत.

**१) नामदेव ढसाळ :-**

नामदेव ढसाळ यांनी अनियतकालिकांमधून काव्य लेखनास प्रथम सुरुवात केली. मर्ढेकरांच्या कवितेतून येणारे जीवन दर्शन जसे मराठी कवितेला नवीन होते तसे ढसाळांच्या कवितामधून येणारे जीवनही अनोखेच होते. या अनोख्या जगाची कविता त्यांनी विपुल प्रमाणात लिहिली. गोल पिठा (१९७२), मुर्ख म्हताऱ्याने डोंगर हलविला (१९७५), प्रियदर्शनी आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र (१९७६), तु ही इयत्ता कंची (१९८१), खेळ (१९८३), गांडू बगीचा (१९८६) या सत्तेत मन रमत नाही (१९९५) इत्यादी काव्यसंग्रहातून ढसाळांनी जेथे पांढरपेशा हिशेबी माणसांची दुनिया नसते तिथून आपल्या कवितेतील माणसांचे जग सुरु केले आहे.

" सर्वसामान्य माणसाला सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यापासून वंचित ठेवणाऱ्या शोषण व्यवस्थेला सुरुंग लावणाऱ्या तमाम छोट्या-मोठ्या चळवळींना, प्रवृत्तीना" त्यातून त्यांची भूमिका व कवितेची वैशिष्ठ्ये लक्षात येतात. नामदेव ढसाळ हे दलित कवितेतील महत्वाचा टप्पा आहेत. त्यांची कविता ही प्रस्थापित मुल्यांचा विध्वंस करणारी कविता आहे त्यामुळे शब्दांचा आणि भाषेचा निखरा तिला मान्य नाही. नामदेव ढसाळांच्या कवितेत आशय हेच तिचे बलस्थान आहे.

**२) यशवंत मनोहर :**

यशवंत मनोहर यांनी 'उत्थानगुंफा' (१९७७) डॉ. आंबेडकर एक चिंतन काव्य' (१९८२) आणि मूर्तिभंजन' (१९९५) हे तीन कविता संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांची कविता दलित जाणिवेलाच व्यक्त करीत आहे. प्रामुख्यांने त्यांची कविता

विद्रोहाची कविता आहे. ईश्वर शाही, अध्यात्म, कर्मविपाकाच्या नावाखाली येथे ते सतत शोषण केले गेले त्या शोषणाविरूध्द लढा देण्यासाठी ही कविता पुढे आलेली आहे.

भूतकालीन धर्मव्यवस्थेचा आणि अर्थ व्यवस्थेचा कडवा परामर्श यशवंत मनोहरांची कविता घेते. प्राचीन वर्ण व्यवस्था, मनू आंधळे मन, जुनाट संस्कार, पक्षपाती संस्कृती, खोटी लोकशाही आणि तिने दलितांना दिलेली उपकार स्वरुप वागणूक आठवून त्यांची कविता म्हणते,

काढीला खणुनि काळोख । घर कुठेच दिसले नाही.
जन्माने घेऊन ओझे । उन्मळलो ठायी ठायी ।
दुनियेत चंद्रसूर्याच्या । मजकुणीच घेतले नाही ।
या जन्माची कधी माझ्या । कुणी आई झाले नाही ।'

अशा या वरील काव्यपंक्तीतून यशवंत नोहर यांनी वेदना व्यक्त केली आहे.

**३) अर्जुन डांगळे :-**

अर्जुन डांगळे हे महाराष्ट्रामध्ये चैतन्य निर्माण करणाऱ्या 'दलित पँथर' च्या संघटनेचे आघाडीचे नेते, कॉलेज जीवनापासूनच राजकीय व सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग, त्यांनी कथा, कविता आणि वैचारिक लेखन इत्यादी क्षेत्रामध्ये कार्य केले आहे.

'छावणी हालत आहे' (१९७७) हा कविता संग्रह 'ही बांधवरली माणसं' आणि 'दलित साहित्य एक अभ्यास' हे संपादन ग्रंथही त्यांची तीन प्रकाशित पुस्तके प्रसिध्द आहेत. त्यांच्या कवितांतून समाज जीवनाच्या कुरुपतेची चित्रे प्रभावीरितीने येतात. तितक्याच स्वाभाविकपणे मानवी मनाच्या सोशिकतेचा व समंजसपणाचा उद्‌गारही सापडतो. 'झुंजार व आशावादी स्फुल्लिंगे उसळणारी प्रतिभा' असे डांगळे यांच्या कवितेचे स्वरुप आहे

दलित पँथरच्या कार्यकर्त्यांच्या मुखातून निघालेल्या संघर्षाच्या घोषवाक्यांचे रुप त्यांनी आपल्या कवितांना दिलेले आहे. हा संघर्ष दलितांच्या मुक्तिसाठी व पैशाच्या राशीवर लोळणाऱ्या जुलमी सत्तापिपासूंच्या जोखडाखालून मन सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या कष्टकरी दलित जनतेपुरता मर्यादित नाही. त्यांची भुमिकाच मुळी संकुचित नाही. त्यांची कविता जात, समाज, देश ह्यांची बंधने तोडून विश्वाला गवसणी घालते. अर्जुन डांगळे यांच्या कवितेत जगण्याचा संघर्ष दिसतो. डांगळे यांची कविताही संघर्षाच्या मनोवृत्तीतून निर्माण झालेली कविता आदेशमुक्त ठरते. मर्यादेचे कुंपण ओलांडून जाणारी वृत्ती क्वचित निराशही होते.

**४) वामन निंबाळकर :**

वामन निंबाळकर यांनी कथा, कविता व वैचारिक लेखन केलेले आहे. त्यांच्या 'गावकुसाबाहेरील कविता' या संग्रहामध्ये दलित जीवनाचे दु:ख, त्याबद्दलची तीव्र चीडही त्यांच्या कवितेत दिसून येते. हळूवार कुटुंब चित्रण आणि आशावादी भविष्य ह्यातही रममाण त्यांची कविता येते. म्हणून त्यांची कविता गाव कुसाबाहेरचे दु:ख वेशीवर टांगणारी जीवनदायी कविता आहे.

गावकुसाबाहेर कविता संग्रहातील सर्वच कविता स्वत:चे असे अनुभव विश्व घेऊन येते की, ज्यात जीवनविषयी भयंकर उदासिनता जाणवते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अन्याय, अत्याचाराचा हा डोंब आपल्या कवितेतून साकारताना दलित जीवन जाणिवेचे धागे उकलीत येणारी ही कविता गावकुसाबाहेर जगणाऱ्यांचे अस्पृश्यतेच्या शापामुळे ज्यांच्या वाट्याला हीन कर्मे आलीत त्यांचे जीवन साकार करीत जाते. अस्पृश्यतेचा कलंक शुध्द स्वार्थी दांभिकतेच्या मनुचा वासरा आहे. म्हणूनच निंबाळकरांची कविता त्यांच्याविरुध्द आवाज उठविते. 'बुध्द धम्माचा विचार हा माणसाला माणुसकी सांगणारा, समता, स्वातंत्र्य बंधुत्वाचा व खऱ्या अर्थाने लोकशाही समाजवादाचाही विचार आहे. निंबाळकरांनी हा विचार स्वीकारल्यामुळेच त्यांची कविता क्रांती विचारांची

15921

झालेली आहे. ती नुसतीच सामाजिक अस्मिता टिकवून धरणारी कविता उरलेली नाही तर संपूर्ण मानवतावादाचा पुरस्कार करुन उसळणारी कविता आहे. वामन निंबाळकर यांनी माणूस हाच केंद्र बिंदू ठेवूनच कविता लिहीलेल्या आहेत.

**५) केशव मेश्राम :**

'उत्खनन', 'जुगलबंदी' व अकस्मात हे कवितासंग्रह दोन कादंबऱ्या, दोन गद्याची पुस्तके, तीन कथासंग्रह तीन समीक्षा पर लेखनसंग्रह, बाल कथासंग्रह व संपादित पुस्तक अशी ३५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

व्यक्तिगत भावानुभवांचे केंद्र न सोडताही विराट समुद वेदनेशी समन्वय साधणारी कविता असे त्यांच्या कवितेचे वर्णन करता येईल. अनेकार्थ सूचक शब्दरचना, मानसिक स्पंदनाचे चढउतार आणि टवटवीत प्रतिमायोजन हे कवी मेश्राम यांच्या काव्याची वैशिष्ठ्ये आहेत.

केशाव मेश्राम हे दलित कवी असले तरी त्यांची कविता आणि इतर दलित कवींची कविता वेगळ्या प्रकारची आहे. त्याच्या काव्यातील दलित जाणीव ही समाजातील सुक्ष्म आत्मशोधाची जाणीव आहे. केशम मेश्राम कवितेच्या माध्यमातून शहरातील कुचंबणेचा वेध घेताना दिसतात. शहरातील संघर्ष वेगळ्या पातळीवरून त्यांना जाणवतो. 'फ्लॅट फॉर्म नंबर चार', नऊ पंचवीस ते नऊ पंचावन्न' या कवितेतील संघर्ष केवळ दलितांचा राहत नाही तर तो सर्वसामान्य जीवांचा होतो. त्यांच्या कविता समाजिक भ्रष्टाचाराकडेही लक्ष वेधतात. समाजात चाललेल्या भोंदुगिरीची डोळे झाकून बसलेल्या समाज पुरुषाचीही ते चिरफाड करतात. या समाज परिक्षणासाठी त्यांची कविता पुष्कळदा 'कथात्मक' रुपबंधाचा आश्रय घेते. अशा कविता कांहीशा स्पष्टीकरणात्मक झाल्या असल्या तरी प्रत्ययकारी झाल्या आहेत. त्यांच्या कवितेविषयी शांता शेळके म्हणतात, " अत्यंत आत्मस्त असूनही सामाजिक बांधिलकी आग्रहपूर्वक मांडणारा हा कवी म्हणून त्यांची कविता जितकी त्यांची आहे, तितकीच ती समाजाच्या एका

थराचीही आहे.''[२] केशव मेश्रांमाच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्ठ्ये असे कि, ती विद्रोहाची आणि बंडखोरीची कविता असली तरी सुडवाटाची कविता नाही. तिचा दृष्टीकोन मानवतावादी आहे म्हणून ती 'माणुस' केंद्र आणि माणसाचे जीवन हा संदर्भ मानणारी कविता आहे.

**६) प्रल्हाद चेंदवणकर :-**

प्रल्हाद चेंदवणकर यांनी 'ऑडिट' आणि 'ऑर्डर-ऑर्डर' कविता संग्रह लिहिले आहेत. दलितांच्या पारंपारिक दुःखाची झळ स्वतः भोगलेली असल्यामुळे त्यांचे शब्द कवितेतून बिजेसारखे कडाडताना दिसतात. त्यांची कविता वास्तव अनुभव सांगताना दिसते. बाबासाहेबांनी दिलेल्या झुंजार विचार प्रणालीचा अविष्कार चेंदवणकरांची कविता करताना दिसते. त्यांच्या कवितेतून विद्रोह, संताप अगतिकता ह्यांचे दर्शन होत असले तरी अनुभवाची सुक्ष्मता आणि कल्पकता त्यांच्या काव्यामध्ये थोड्या फार प्रमाणात कमी जाणवते.

'ऑडिट' या आपल्या पहिल्याच काव्यसंग्रहातून त्यांनी प्रतिभा सामर्थ्याची चुणूक दाखविली आहे. समाजाच्या कृत्याची तपासणी करण्याची, 'ऑडिट' करण्याची वृत्ती साहसी आहे. त्याच्या आवेशाला साजेशा मोजक्या पण समर्थ प्रतिमा योजल्या आहेत.

'ऑर्डर-ऑर्डर' या काव्यसंग्रहात विषम समाजरचनेचे अस्पृश्यपण देणाऱ्या विषयीचा संताप चेंदवणकर त्वेषाने व्यक्त करतात ते आपल्या सुरुवातीच्या कवितेतून धुर्त, संधिसाधू आणि उपरा कळवळा दाखविणाऱ्यांवर कवी शाब्दिक हल्ला करतात. 'बगळा' या प्रतिमेतून 'बगळा' हा धुर्त व चलाख पक्षी पांढऱ्या रंगाचा पण मनात काळेबरे ठेवणारा आहे. सत्तेवर आपलाच हक्क कायम ठेवणारी उच्चवर्णियांची समाजप्रवृत्ती, बगळ्याशी साधर्म्य दाखविणारी आहे. दलितेरांमधील स्वार्थी वृत्तीला बगळा 'प्रतिमा' संबोधून कवीने दलितेरांच्या दांभिकतेचा बुरखा पाडला आहे. प्रल्हाद चेंदवणकरांनी आपल्या अनुभव

विश्वातील अनेक विसंगती समर्पक शब्द योजनांनी व्यक्त केलेल्या आहेत. मोजक्या व बोलक्या शब्दांची योजना हा त्यांच्या काव्याचा महत्वाचा विशेष आहे.

**७) त्र्यंबक सपकाळे :-**

त्र्यंबक सपकाळे यांचा 'सुरुंग' हा काव्यसंग्रह १९७६ साली प्रकाशित झालेला आहे. आंतरिक स्फोटाचा प्रचंड नाद आणि त्यांचे साद पडसाद, सपकाळे यांच्या कवितेत प्रभावी रितीने व्यक्त होतात. लढाऊपण संमंजस, आक्रमकपण दिलदार व उग्रपण काव्यात्मक असे त्यांच्या कवितेचे स्वरुप सांगावे लागेल. त्यांची कविता लोकभाषेच्या ठसक्यामुळे व भावलयीमुळे तर ती संपन्न व पृथागात्म झाली आहे. म्हणून त्यांची कविता अनुभववाशी प्रमाणिक आहे. बाबासाहेबांच्या विधायक कार्याचा, विचार प्रणालीचा आणि बुद्धाच्या तत्त्व विचाराचा पुनरुच्चार ही त्र्यंबक सपकाळे यांच्या कवितेची प्रेरक शक्ती आहे. त्र्यंबक सपकाळे यांची कविता आवाहन आणि द्वंद्वात्मक जाणिवा प्रकट करुन पुढे जाणारी नाही. त्यांची कविता वैचारिक आणि समाजमनाशी संवाद करणारी आहे. सपकाळे यांची 'सुरुंग' या संग्रहातील कविता रसरशीत जिवंत दलित मनाचा अविष्कार करणाऱ्या आहेत. त्यांच्या कवितेत जुन्या अन्यायाचे प्रतिनिधीक पातळीवर उतरलेले चित्रण आहे. तिच्यातील अभिविवेश प्रामाणिक आहे आणि त्याचबरोबर तिला वैचारिकतेचे अधिष्ठान लाभले आहे. त्र्यंबक सपकाळे यांची कविता अंतर्मुख होऊन विचार करावयास लावते, अस्वस्थ करते आणि समग्र मानवजातीच्या कल्याणाचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. त्र्यंबक सपकाळे यांच्या काव्य विकासाच्या खुणा या वैचारिक संपन्नतेवरुन पुढे ओळखता येतील एवढी ती विकासक्षम आहे.

**८) ज. वि. पवार :-**

ज. वि. पवार यांनी 'नांकेबंदी' (१९७६) आणि संपादीत 'उच्छवास युगंधराचे असे दोन कविता संग्रह प्रसिद्ध केले आहेत. त्यांची कविता डॉ. बाबासाहेबांचे

नेतृत्त्व जीवापाड जपणारी आहे. ''तू झाला परिस्थिती वर स्वार आणि घडविलास नवा इतिहास'' असे म्हणून कवी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरवही करतात. ज. वि. पवार यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून दलित जीवनाची व्यथा मांडलेली आहे. दलितांच्या जीवनाची नाकेबंदी जागोजाग कशी करण्यात आली. आणि जागृत झालेली माणसे क्रांती कशी करतात हे ज. वि. पवार यांनी कवितेत व्यक्त केले आहे.

**९) भीमसेन देठे :-**

'होरपळ' (१९७०) व 'कृष्णमेघ' या दोन काव्यसंग्रहामुळे दलित कवितेत भीमसेन देठे यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी विविध अंकातून कथा कविता लिहिलेल्या आहेत. भीमसेन देठे यांची कविता आत्मचिंतनाकडे झुकलेली असून ती प्रगल्भता सिद्ध करण्यास वचनबद्ध आहे. कवी परमेश्वराला उद्देशून म्हणतो, मी तुला देव मानत नाही, तरी प्रतिमेसमोर उभे राहताना जुळतात आपोआप हात. भीमसेन देठे यांच्या कवितेतून अत्यंत स्फोटक पण समृद्ध भाव जीवनाचे दर्शन त्यांच्या कवितांतून प्रभावीपणे घडते. नाट्यपूर्ण व कौटुंबिक शब्द चित्रे रेखाटण्यात भीमसेन देठे यशस्वी झाले आहेत.

**१०) प्रकाश जाधव :-**

प्रकाश जाधव यांचा १९७८ प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह 'दस्तरवत' हा दलित कवितेतील महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांची कविता म्हणजे मुंबई महानगराच्या वाङ्मयीन आणि सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाचा भाग आहेत आणि या पर्यावरणाचा भाषेबरोबर तपशील त्यांच्या काव्यात येतो. या महानगरीय जन सामान्यांच्या यातनांशी कवीची बांधिलकी आहे. या यातना समाज संस्थेच्या पोटी जन्माला येतात. या कवितेच्या माध्यमातून कवीने व्यक्त केल्या आहेत. ही क्रुर समाज रचना आहे म्हणून जाधव लिहितात,

आकाश वेगळी झिपरी रज हुडकीत,

कचऱ्याच्या ढिगाआड बुडताना,

लाख उमरवय्याम जागे होतात स्वप्नातून,

सच्चा वास्तवापुढे होकू सायची चित्रे,

आखूड वाटू लागतात अन् विसंगत,"[३]

हे भूकेचे वास्तव लाख उमरवय्यामांची झोप उडवणारे आहेत. हे वास्तव कसे बदलायाचे? हा प्रश्न कवी प्रकाश जाधव यांना पडलेला आहे. म्हणून प्रकाश जाधव यांना हा समाज संस्थाच पार बदलून टाकली पाहिजे असे वाटते.

**११) ज्योती लांजेवार :-**

'दिशा' (१९८२) हा ज्योती लांजेवार यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांच्या कवितेतून विविध स्तरांमध्ये वावरणाऱ्या व्यक्तींच्या मनोभावना प्रकट होताना दिसतात. दलित समाजात बदल घडवून आणण्याची ताकद असलेली, दलितांच्या वेदना शब्दांत समर्थपणे व्यक्त करणारी ही कविता आहे. या कवितेत कवयत्रिला समाजामध्ये जे जे अनुभव आले ते तिने काव्यरुपामध्येच प्रकट केले आहेत. 'सामाजिकता' हा त्यांच्या कवितेचा प्राण आहे. मानवतेच्या आणि समानतेच्या प्रतिष्टापनेसाठी क्रांतिकारक नवविचारांची पेरणी करणारी त्यांची कविता आहे.

**समकालीन कवींच्या पेक्षा रविचन्द्र हडसनकर यांचे वेगळेपण :-**

प्रस्तूत लघु प्रबंधात रविचन्द्र हडसनकर व त्यंचे समकालीन कवी यांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. रविचन्द्र हडसनकर यांनी 'ठिणगी' या काव्यसंग्रहापासून काव्य लेखनास प्रारंभ केला आहे. यानंतरही रविचन्द्र हडसनकर यांनी आपल्या कवितेतून कसा ठसा उमटविला आहे. हे सिद्ध झाले आहे. परंतु या समकालिन कवीपेक्षा कसे वेगळे ठरतात त्यांचा अभ्यास केलेला आहे तो पुढीलप्रमाणे.

रविचन्द्र हडसनकर हे मराठी साहित्यक्षेत्रात इ.स.१९७७ पासून लेखन करीत आहेत. अत्यंत विचारपूर्वक व सामाजिक दृष्टीकोन त्यांनी काव्य लेखन केले आहे. 'दरी' हा कथासंग्रहात समाजामधील निर्माण झालेली वेगळी फळी ही स्पष्ट केली आहे. त्यांचा पहिला कवितासंग्रह 'ठिणगी' हा सन १९७७ मध्ये निघाला असला तरी त्यांच्या काव्य लेखनाममागे एक वेगळी वैचारिकता ,चिंताशीलता दिसून येते. मराठी साहित्यात एक वेगळे वळण देण्याचे सामर्थ्य त्यांच्या काव्यसंग्रहात आहे. इ.स. १९८० नंतरच्या कवितेच्या विकासाची टप्पा ठरावी अशी कविता रविचन्द्र हडसनकर यांची आहे. मराठी दलित साहित्यातील एक दर्जेदार कवी म्हणून रविचंन्द्र हडसनकरांची कविता पहावी लागते.

इ.स.१९६० मध्ये मराठी साहित्यात दोन वाड:मय प्रवाह आले ते म्हणजे ग्रामीण साहित्य व दलित साहित्य आपापल्या अंगभूत वैंशिष्टयाने मराठी वाड:मयात उठून दिसू लागले. ग्रामीण जीवन, रुढी , परंपरा, शेती तसेच ग्रामीण भागातील दलित जीवन जाती भेद यांच्यातील हेवेदावे असे विविध अंगाचे प्रत्ययकारी दर्शन ग्रामीण व दलित साहित्यात येऊ लागले. विशेषत: दलित साहित्यात कांदबरी नाटकापेक्षा कविता हा वाड:मय प्रकार फारच मोठया प्रमाणात लिहिला गेला आहे. काव्यापासून दलित कवीनी प्रथम आपल्या व्यथा, वेदना, मांडल्या . आपल्या वेदनांना वाट मोकळी करुन दिली. त्यामध्ये कवी नामदेव ढसाळ, अर्जुन डागळे, दया पवार, ज.वि. पवार, त्र्यंबक सपकाळे,भीमसेन देठे, भगवान भोईर, लहु कानडे दामोदर मोरे, प्रकाश जाधव या कवी पेक्षा रविचंन्द्र हडसनकरांनी आपली वेदना काव्याच्या माध्यमातून दमदारपणे मांडली आहे.

रविचंन्द्र हडसनकर यांच्या कवितेत कल्पनेचा सोस नाही. तर सत्य अनुभवलेले जीवनच कवितेतून मांडलेले आहे. ग्रामीण भागातील दलित मन, शोषिक मन, भ्रष्टचाराच्या अस्पृश्तेच्या वणव्यात कसे होरपळून निघते, हे त्यांच्या कवितेत अगदी प्रकर्षाने जाणवते. या शिवाय हडसनकरांची कविता दलित जीवनातील सूक्ष्म आकलन

व काव्यात्म भाषाशैली, समाजातील जीवन जगणाऱ्या माणसांचे बारकावे, रविचंन्द्र हडसनकर यांचे काव्यलेखन इ.स. १९८० नंतरच्या कवितेचा टप्पा ठरते.

दलित साहित्यातील कवीने नामदेव ढसाळ, प्रा. केशव मश्राम, अर्जुन डांगळे दया पवार, भीमसेन देठे, लहुकानडे, वामन निंबाळकर या सर्व कवीने समाजातील वेदना,विद्रोह हाच कवितेच्या माध्यमातून व्यक्त केला आहे. परंतू हडसनकरांची कविता बदलत्या नवीन जाणिवांचे चित्रण कवितेतून व्यक्त करते. तेव्हा रविचंन्द्र हडसनकरांच्या कविते विषयी नरहर कुरुंदकर म्हणतात, हडसनकर ह्यांची कविता ही एक उत्कृष्ट मनाचे कढ व आवेग व्यक्त करणारी कविता आहे. प्रतिमांचा सोस जसा तिला फारसा नाही, त्याप्रमाणे पर्यायोक्ती अगर सूचकता ही सुध्दा तिची साधने नाहीत धीटपणे आपला उत्कृट अनुभव स्पष्ट शब्दात मांडण्याची कवीची पध्दत आहे''[४]

दलित साहित्यात दलित कवीने आजपर्यंत स्वता:ची वेदनाच काव्याच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू हडसनकरांनी स्वता:ची वेदना न सांगता त्यांच्या कविता समाजातील माणसांभोवती फिरताना दिसते. तरुण मनाच्या आकांक्षाचे व सामाजिक व्यवस्थेतील त्यांच्या वेदनांचे चित्र त्यांच्या कवितांतून नेटकेपणाने उमटते''[५] असे केशव मेश्राम म्हणतात. रविचंन्द्र हडसनकरांनी तरुणपिढीला आपल्या समाजातील दु:खाची जाणिव कवितेच्या माध्यमातून करुन देताना दिसतात हेच रविचंन्द्र हडसनकरांच्या कवितेचे विशेष असे वेगळेपण आहे. कवितेतून अत्यंत खालच्या वर्गातील जातीचे दु:ख त्यांच्या भावभावना त्यांची होणारी पिळवणूक विद्रोह इ. गोष्टी आपल्या काव्यपंक्तीतून टिपले आहेत. ही अत्यत महत्वाचे वैशिष्टये मानावे लागेल,

रविचन्द्र हडसनकर यांनी ग्रामीण जीवनावर काव्य लेखन करुन ग्रामीण भागातील लोकांचे जीवन त्यांचे राहणीमान यांचेही निरीक्षण करुन काव्याच्या माध्यमातून त्यांचे जीवन व्यक्त केले आहे. खेड्यातील 'माणूसपण' हरवत चालले आहे. दलित तरुण हा समाजापासून भरकटत चालला आहे याची खंत कवी व्यक्त

करतो म्हणून या तरुण पिढीला रविचन्द्र हडसनकरांची कविता जाणीव करुन देताना दिसते. हे या कवीचे वेगळेपण इतरांपेक्षा असे आहे असे म्हणावे लागेल. रविचन्द्र हडसनकरांची कविता राजकिय जीवनावरही प्रकाश टाकताना दिसते. समाजातील राजकीय नेते अशिक्षित, अडाणी लोकांची कशी फसवणुक करतात. मतदानाच्यावेळी त्यांनी नुसती आश्वासन देतात नंतर निवडून आले की, त्यांच्याकडे थोडे वळूनही मागे पहात नाहीत. कामगारांचे जीवन हडसनकरांनी कवितेतून सांगून त्यांचे कसे हाल केले जातात. कामगारांना थोड्या मोबदल्यात जादा वेळ काम करुन कसे घेतले जाते. पोटाची खळगी भरण्यासाठी माणूस कोणतेही काम करण्यासाठी मागे पुढे पहात नाही. कोणत्याही प्रकारचे काम कितीही तास करावयास तयार होतो व पोटाची भूक भागवितो तो अन्याय, अत्याचाराला कधीही प्रतिकार करत नाही. पण हडसनकरांनी कवितेच्या माध्यमातून अन्यायाला प्रतिकार केलेला आहे. हीच हडसनकरांच्या कवितेचे वेगळेपण येथे सिध्द होते.

शेतकरी जीवनाचाही वेध घेताना त्यांची कविता दिसून येते. शेतकरी शेती पिकवून स्वतः काही पोटासाठीही शिल्लक ठेवत नाही. परंतू त्याच्या शेतीतून पीक आलेले काही राजकिय लोकच ते हडप करतात. कष्ट करून, घाम गाळून फुलवून देणारे त्यांचे कोरडेच हात राहतात. याचीच कवीला खंत वाटत रहाते. रविचन्द्र हडसनकरांनी काही स्मृतीस उजाळा देणाऱ्या कविता लिहिलेल्या आहेत. हेही त्यांच्या कवितेतील वेगळेपण सांगावे लागेल. काही कर्तृत्ववान असणारी माणसे आपल्यापासून कायमचीच निघून गेलेली आहेत म्हणून त्यांना कवितेच्या माध्यमातून रविचन्द्र हडसनकरांनी श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांचे कर्तृत्व त्यांच्या जीवनाची गाथा हि कवितेच्या माध्यमातून कवी रविचन्द्र हडसनकरांनी सांगितले आहे हे पण त्यांच्या कवितेतून वेगळेपण जाणवते.

शाहु, फुले, आंबेडकर यांचा विचारही त्यांनी कवितेच्या माध्यमातून तरुण पिढीसमोर सांगताना त्यांची कविता आपणाला दिसून येते. रविचन्द्र हडसनकरांच्या समग्र

वाङ्:मयाविषयी देवीदास फुलारी म्हणतात, " रविचन्द्र हडसनकरांच्या समग्र वाङ्:मयाचे अवलोकन केले की, लक्षात येते की, त्यांच्यावर कबीर, फुले आणि आंबेडकर महात्म्यांच्या विचारांचा प्रभाव आहे. त्यांची काव्य भावना साक्ष देते."[६] रविचन्द्र हडसनकर यांचे इतर कवीपेक्षा विशेष असे वेगळेपण म्हणजे 'सूर्यझेप' आणि 'तळगर्भ' हा स्त्री जीवनावर आधारीत असा काव्यसंग्रह लिहिला आहे. त्यातूनही हडसनकरांच्यात वेगळेपणा जाणवतो. 'सूर्यझेप आणि तळगर्भ' या काव्यसंग्रहात पहिल्या टप्प्यात लिहिली आहे. म्हणून श्रध्दा बेलसरे -खारकर म्हणतात, " सूयझेप आणि तळगर्भ'या कविता संग्रहात रविचन्द्र हडसनकर यांनी मोठ्या ताकदीने याचे वास्तववादी चित्रण केलेले आहे."[७] पहिल्या टप्प्यात त्यांनी माजी खासदार श्रीमती सुर्यकांता पाटील या कर्तबगार स्त्री जीवनाचा शब्दबध्द आलेख लिहिला आहे. एखादी स्त्री जेव्हा राजकारणात जेव्हा पाऊल ठेवते त्यावेळी तिला कोणकोणत्या संकटांना सामोरे जावे लागते याचाच विचार या काव्यसंग्रहात केला आहे. त्यातून ती कशाप्रकारे यशाचा मार्ग काढून यशस्वी होते याचेही चित्रण कवीने अतिशय वेगळ्या पध्दतीने केल्याचे दिसून आलेले आहे.

शेतकऱ्यांच्या अडी-अडचणी समजावून ती सोडविण्यासाठी झटणारी स्त्री ही त्यांच्या कवितेतून दिसते. हे वेगळेपण त्यांच्या कवितेतून जाणवते. सूयझेप आणि तळगर्भ च्या काव्यसंग्रहाविषयी श्रध्दा बेलसरे खारकर म्हणतात," स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकारणात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात नसला तरी त्या राजकारणी महिलांची भूमिका लक्षवेधी आहे, खेड्यापाड्यातून बहुजनामधून स्त्रियांनी फार मोठे कार्य केले आहे. अनेक स्त्रिया महाराष्ट्रात आहेत, या स्त्रियांची अत्यंत लोभसवाणी चित्रण हडसनकरांनी रेखाटलेली आहे."[८] एक स्त्री ही पुरुषांबरोबर स्पर्धा करून उंच शिखरावर कशी गेली हे त्याच्या कवितेत दिसून येते. स्त्रीचा गौरव करणाऱ्या येथे त्यांचे वेगळेपण दिसून आले आहे. स्त्री ही शेतकऱ्यांच्या जीवनात आल्यानंतर त्यांच्या अडी-अडचणींना समजावून

ती त्यावर मात कशी करते व शेतकऱ्यांच्या विकासाची गंगा कशी बनते हे वाचकांनी वाचल्यानंतर वेगळेपण इ. कवितेत जाणविल्याशिवाय रहात नाही.

दुसऱ्या टप्प्यात हडसनकरांनी गावकुसाबाहेरील उपेक्षित स्त्रियांचे जीवन चित्रित केले आहे. विशेषतः अठराविश्वे दारिद्रय अंगावर घेऊन दारोदारी भीक मागणाऱ्या सुया, दोरे विकून पोट भरणाऱ्या स्त्रियांचे जीवन हडसनकरांनी कवितेतून रेखाटले. हे इतर कवींपेक्षा त्यांचे वेगळेपण येथे सिध्द होते. रविचन्द्र हडसनकरांनी एकाच समाजातील स्त्री कवितेत न घेता त्यांनी वेगवेगळ्या जाती धर्मातील स्त्री घेतली आहे. त्या फडे विकणारी चादबीबी, माठ विकणारी सीता कुंभारीन शिदोरी सोडण्याचा निरोप गावभर सांगणारी सगुणा न्हावीण, लालचोळी, लेंगा घालून शिमग्याला धुंद नाचणारी राधा लमाणीन अशा विविध जाती जमातीच्या स्त्रिया हडसनकरांनी आपल्या कवितेतून त्यांच्या वेदना व्यक्त केल्या आहेत. 'सूर्यझेप आणि तळगर्भ' यातील कवितेविषयी इंद्रजीत भालेराव म्हणतात, " या कवितेत वनवासी जिवांचे जगणे नेमक्या शब्दात पकडण्यात हडसनकर मधला गीतकार त्यांच्या मदतीला धावून येतो हे आपल्या लक्षात आल्याशिवाय रहात नाही."[१]

रविचन्द्र हडसनकरांनी भटकंती करुन जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली आहे. दलित साहित्यात कोणत्याही कवीने कवितेतून मांडले नाही ते हडसनकरांनी मांडले हे वेगळेपण येथे जाणवते. हडसनकर हे वेगवेगळ्या अंगाने लेखन करतात. ते गीतकारही आहेत. हे रविचन्द्र हडसनकरांचे वेगळेपण आहे. हडसनकरांनी लहान मुलांसाठीही बालगीते लिहून मराठी साहित्यात वेगळा असा ठसा उमटविला आहे. 'बगळ्या बगळ्या पाटी दे' (२००४), ढगा ढगा पाणी दे (२००६) इत्यादी बालगीतामधून त्यांना प्रसिध्दी मिळाली आहे. एकुणच रविचन्द्र हडसनकरांनी कथा, कविता, बालगीते,गीतकार इत्यादी साहित्यातून आपला स्वतःचा वेगळा ठसा उमटविला आहे ते एका अंगाने साहित्य न लिहिता ते विविध अंगाने साहित्य लिहितात हे त्यांच्या साहित्यातील वेगळेपण आहे.

स्त्रीच्या हळुवार मनाचा खंबीरपणे तिचे कर्तृत्व आणि पंखातली झेप यांचा सुंदर आढावा हडसनकर यांनी आपल्या कवितांमधून घेतल्याचे आपल्याला जाणवत राहते. एका पुरुषाने कष्टकरी, कर्तबगार स्त्रियांची दखल इतक्या चांगल्या पध्दतीने घ्यावी हे नसे थोडके''[१०] असे श्रध्दा बेलसरे -खारकर म्हणतात.

अशा अनेक गुण वैशिष्ट्यामुळे आजपर्यंतच्या कवीकारांच्यापेक्षा हडसनकर यांचे वेगळेपण निश्चितच जाणवते.

# संदर्भ सूची


१) मनोहर यशवंत, 'उत्थान गुंफा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे -३० प्र. आ.१९७७ पृ.४०

२) शेळके शांता, 'उत्खनन' या काव्य संग्रहाच्या मल पृष्ठावरील मजकुरातून

३) जाधव प्रकाश, 'दस्तखत' काव्यसंग्रह १९७८ प्र. आ.

४) रविचन्द्र हडसनकर, 'ठिणगी' (कवितासंग्रह) प्रस्तावना, नरहर कुरुंदकर, विजया नगर, पुणे (१९७७)

५) मेश्राम केशव, विद्रोही कविता, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर,पुणे ३० प्र.आ.१९७८ पृ.१०५

६) फुलारी देवीदास, दिवाळी अंक, 'रानफुल' संपादक व प्रकाशन पांडुरंग कुटेवाड, २००७

७) बेलसरे-खारकर श्रध्दा, 'नवा काळ, मुंबई, रविवार २८ मे २००६

८) तत्रैव

९) भालेराव इंद्रजित, दै. लोकसत्ता, दि. २९ नोव्हेंबर २००५

१०) बेलसरे-खारकर श्रद्धा, 'नवा काळ, मुंबई रविवार २८ मे २००५